लोकमत

**कार्यक्रम प्रक्रिया आज जाहीर होणार : ११२ महाविद्यालयांत 'ओबीसी', तर ७६ महाविद्यालयांत एस.सी. प्रवर्ग**

# विद्यार्थी परिषदेच्या निवडणुकीचे आरक्षण जाहीर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील अधिविभाग एक आणि २९३ संलग्नित महाविद्यालयांतील विद्यार्थी परिषदेच्या निवडणुकीचे राखीव संवर्गातील प्रवर्गाचे आरक्षण सोमवारी सोडत पद्धतीने जाहीर करण्यात आले. त्यात विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांतील ११२ महाविद्यालयांमध्ये इतर मागासवर्ग संवर्गाचे (ओबीसी), तर ७६ महाविद्यालयांमध्ये अनुसूचित जाती संवर्गाचे (एस. सी.) आरक्षण जाहीर झाले. या परिषदेच्या निवडणुकीचा कार्यक्रम आज, मंगळवारी सायंकाळी ५ वाजता विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागातर्फे जाहीर केला जाणार आहे.

विद्यार्थी परिषदेमधील सदस्यांत राखीव संवर्गातील प्रतिनिधी असणार आहेत; त्यासाठी आरक्षण सोडत काढण्याची प्रक्रिया विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात सकाळी ११ वाजता सुरु झाली. या प्रक्रियेत ओबीसी, एस. सी., अनुसूचित जमाती (एस. टी.), विमुक्त जाती (व्ही. जे. (ए), भटक्या जमाती (एन. टी. (बी), (सी), (डी) या संवर्गातील सोडत काढण्यात आली. ही प्रक्रिया निवडणूक निर्णय अधिकारी डी. एन. काशीद, विद्यापीठ विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, प्रा. पी. एम. गुरव, एस. टी. कोंबडे, ए. बी. कोळेकर, उपकुलसचिव जी. एस. राठोड यांनी राबविली. महाविद्यालयात कोणत्या राखीव प्रवर्गाचे आरक्षण पडले आहे. ते जाणून घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी सभागृहात गर्दी केली. आरक्षण जाहीर होताच, त्याची माहिती ते आपल्या सहकाऱ्यांना मोबाईलद्वारे देत होते.

शिवाजी विद्यापीठ





कोल्हापुरात सोमवारी शिवाजी विद्यापीठात विद्यार्थी परिषदेच्या निवडणुकीतील आरक्षण सोडतीची प्रक्रिया राबविण्यात आली.

| प्रवर्ग | महाविद्यालये | आरक्षणाची टक्केवारी |
|---|---|---|
| एस. सी. | ७६ | २६ |
| एस. टी. | ४१ | १४ |
| व्ही. जे. (ए) | १८ | ६ |
| एन. टी. (बी) | १५ | ५ |
| एन. टी. (सी) | २० | ७ |
| एन. टी. (डी) | १२ | ४ |
| ओबीसी | ११२ | ३८ |

## अशी राबविली प्रक्रिया

विद्यापीठ अधिविभाग आणि २९३ महाविद्यालयांच्या नावाच्या चिठ्ठ्या करुन त्या एका पारदर्शक बाऊलमध्ये ठेवण्यात आल्या. एस. सी. प्रवर्गापासून आरक्षणाची सोडत काढणे सुरु झाले. प्रत्येक विद्यार्थ्याच्या हस्ते एक चिठ्ठी काढण्यात आली.

आरक्षणाची सोडत झाल्यानंतर आता विद्यार्थी परिषदेच्या निवडणुकीचा कार्यक्रम आज, मंगळवारी सायंकाळी जाहीर केला जाईल. कार्यक्रम जाहीर झाल्यापासून आचारसंहिता लागू होणार आहे.

**- डॉ. आर. व्ही. गुरव,** संचालक, विद्यापीठ विद्यार्थी विकास विभाग

# विद्यार्थी परिषद निवडणूक आरक्षण सोडत

## मतदार यादी लवकरच; सर्वाधिक ७६ महाविद्यालयांत आरक्षित जागा अनुसूचित जातीसाठी

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २९ : शिवाजी विद्यापीठांतर्गत असणाऱ्या महाविद्यालयांत विद्यार्थी परिषदेच्या निवडणुका होणार आहेत. प्रत्येक महाविद्यालयातून एक प्रतिनिधी हा आरक्षित प्रवर्गातून निवडून येईल. यासाठी आवश्यक असणारी आरक्षणाची सोडत आज विद्यापीठात काढण्यात आली. यातून महाविद्यालयांचे आरक्षण ठरविण्यात आले. यात सर्वाधिक आरक्षण अनुसूचित जातीसाठी असून, ७६ महाविद्यालयांत या प्रवर्गातील उमेदवार आरक्षण गटात निवडणुकीला उभा राहील.

न्यायालयाच्या निर्णयानंतर राज्य सरकारने सर्व विद्यापीठांतर्गत येणाऱ्या महाविद्यालयांत विद्यार्थी परिषदेच्या निवडणुका होणार आहेत. यासाठीचा निवडणूक कार्यक्रम, आचारसंहिता बनविण्यात आली. प्रत्येक महाविद्यालयातून खुला गट, विद्यार्थिनी प्रतिनिधी, आरक्षित प्रतिनिधी, क्रीडा, कला प्रतिनिधी निवडणूक लढवून निवडले जाणार आहेत, तर राष्ट्रीय सेवा योजना आणि राष्ट्रीय छात्र सेना या वर्गातील प्रतिनिधीची निवड त्या त्या महाविद्यालयांचे प्राचार्य करणार आहेत. आरक्षित गटातील निवडणुकीसाठी प्रत्येक महाविद्यालयातील आरक्षण कायद्यानुसार सोडत काढून ठरविण्यात आले.



| आरक्षण प्रवर्ग व महाविद्यालये | |
|---|---|
| **प्रवर्ग** | **संख्या** |
| अनुसूचित जाती | ७६ |
| अनुसूचित जमाती | ४१ |
| विमुक्त जाती (अ) | १८ |
| विमुक्त जमाती (ब) | १५ |
| विमुक्त जमाती (क) | २० |
| विमुक्त जमाती (ड) | १२ |
| इतर मागास वर्ग | ११२ |

यासाठी आज विद्यापीठातील राजर्षी शाहू सिनेट सभागृहात सकाळी अकरा ते दुपारी एक या वेळेत ही सोडत काढण्यात आली. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम झाला.

या वेळी काचेच्या पेटीत विद्यापीठांतर्गत येणाऱ्या २९३ महाविद्यालये आणि शिवाजी विद्यापीठातील अधिविभाग असे २९४ संस्थांच्या चिठ्ठ्या होत्या. विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या हस्ते सोडत काढण्यात आली. त्यानंतर आरक्षणाची निश्‍चिती केली गेली. यावेळी डॉ. डी. एन. काशीद, डॉ. डी. एम. गुरव, डॉ. डी. के. राठोड, डॉ. एस. टी. कोंबळे, डॉ. ए. बी. कोळेकर उपस्थित होते.

पुढारी

# विद्यापीठ, महाविद्यालये निवडणूक रणधुमाळी सुरू



शिवाजी विद्यापीठातून

## २९४ महाविद्यालयांचे चिठ्ठ्यांद्वारे आरक्षण जाहीर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या महाविद्यालये व विद्यापीठ अधिविभागाच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. निवडणुकीसाठी २९४ महाविद्यालयांमधील राखीव प्रवर्गासाठी सोमवारी चिठ्ठ्यांच्या माध्यमातून आरक्षण सोडत काढण्यात आली.

विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालये, विद्यापीठ अधिविभागाच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. तब्बल २५ वर्षांनंतर यंदा महाविद्यालयांच्या कॅम्पसमध्ये विद्यार्थी परिषद निवडणुका होत आहेत. त्यानुसार ३० जुलै रोजी निवडणुकीचा पूर्ण कार्यक्रम करण्याच्या सूचना आहेत. आरक्षण सोडतीसाठी कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांतून विद्यार्थी सकाळी अकरा वाजल्यापासून विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सिनेट सभागृहात उपस्थित होते.

विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत विद्यार्थ्यांच्या हस्ते सोडत काढण्यात आली. यामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय या राखीव संवर्गांना कोणत्या प्रवर्गाचे आरक्षण जाहीर झाले, याचे चित्र स्पष्ट झाले. याबाबत विद्यार्थ्यांनी संमिश्र प्रतिक्रिया व्यक्त केल्या.

विद्यापीठ, महाविद्यालय निवडणुकीची तयारी पूर्ण झाली आहे. ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात विद्यापीठातील अधिविभागांचे विद्यार्थी, शिक्षकांसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहे. याच्या माध्यमातून निवडणुकीची सर्व माहिती दिली जाणार आहे. विद्यापीठाच्या इलेक्शन वेबपोर्टलवर निवडणुकीची सर्व माहिती देण्यात येणार असल्याचे विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी सांगितले.

| आरक्षण प्रवर्ग | कॉलेज संख्या |
|---|---|
| एससी प्रवर्ग | ७६ |
| एसटी प्रवर्ग | ४१ |
| व्हीजे (ए) | १८ |
| एनटी (बी) | १५ |
| एनटी (सी) | २० |
| एनटी (डी) | १२ |
| ओबीसी | ११२ |

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 0 JUL 2019

पुण्यनगरी

# विद्यापीठ निवडणूक आरक्षण सोडत जाहीर

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

महाविद्यालयीन विद्यार्थी परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सोमवारी शिवाजी विद्यापीठामध्ये राखीव प्रवर्गासाठी चिठ्ठ्या टाकून सोडत काढण्यात आली. यानुसार विद्यापीठाच्या अखत्यारित येणाऱ्या २९४ कॉलेजमधील आरक्षण जाहीर करण्यात आले. सोडतीसाठी कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतून मोठ्या संख्येने विद्यार्थी सकाळी अकरा वाजल्यापासूनच विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सिनेट सभागृहात आले होते. विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत विद्यार्थ्यांच्या हस्ते ही सोडत काढण्यात आली.

तब्बल २७ वर्षांनी या वर्षी प्रथमच महाविद्यालयांच्या कॅम्पसमध्ये विद्यार्थी परिषद निवडणुका रंगणार आहेत. राज्य सरकारने या निवडणुकांचे नियोजन करण्याच्या सूचना विद्यापीठांना दिल्या आहेत. त्यानुसार ३० जुलै रोजी निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होणार असून, या पार्श्वभूमीवर सोमवारी राखीव प्रवर्गासाठी चिठ्ठ्यांच्या माध्यमातून सोडत काढण्यात आली.

यामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय या राखीव प्रवर्गांना शिवाजी विद्यापीठाच्या अखत्यारित समाविष्ट असलेल्या कॉलेजमध्ये कोणत्या प्रवर्गाचे आरक्षण जाहीर झाल्याचे चित्र स्पष्ट होणार आहे. दरम्यान, एकूण २९४ कॉलेजसाठी आरक्षण सोडत पूर्ण होण्यासाठी चार तासांचा अवधी लागला. एससी प्रवर्गासाठी ७६ महाविद्यालयांमध्ये आरक्षण जाहीर झाले, तर एसटी प्रवर्गातून ४१ कॉलेजमध्ये यंदाची निवडणूक रंगणार आहे. व्हीजेसाठी ए या गटातून १८ कॉलेजमधील विद्यार्थ्यांना संधी मिळणार आहे. एनटी प्रवर्गातील बी गटातून १५ कॉलेजला आरक्षण मिळाले, तर सी गटातून २० कॉलेजची वर्णी लागली आहे. डी गटातून १२ कॉलेजमधील विद्यार्थी रिंगणात उतरू शकतात. ओबीसी प्रवर्गातून ११२ कॉलेजमध्ये आरक्षण मिळाले आहे.

# विद्यार्थी निवडणुकांसाठी सोडत

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर



## निवडणुकीतील पहिला टप्पा पूर्ण

कॉलेजच्या जीएसपासून ते विद्यापीठाच्या यूआर प्रतिनिधी ठरवणाऱ्या विद्यार्थी परिषद निवडणुकीचे पडघम वाजण्यास सुरूवात झाली आहे. राखीव प्रवर्गातून निवडणुकीच्या रिंगणात उतरणाऱ्या विद्यार्थ्यांची शिगेला पोहोचलेली उत्सुकता सोमवारी संपली आणि शिवाजी विद्यापीठांतर्गत येणाऱ्या २९४ कॉलेजमधील आरक्षण सोडतमधून उत्सुकतेच्याही चिठ्ठ्या उलगडल्या. विद्यापीठाच्या शाहू सिनेट हॉलमध्ये सोडतीतील प्रत्येक चिठ्ठीसोबत राखीव आरक्षणाच्या कक्षेत येणाऱ्या इच्छुकांनी आनंद साजरा केला.

तब्बल २७ वर्षांनी यंदा महाविद्यालयांच्या कॅम्पसमध्ये विद्यार्थी परिषद निवडणुकीचे ढोल वाजणार आहेत. राज्य सरकारने या निवडणुकांचे नियोजन करण्याच्या सूचना विद्यापीठांना दिल्या आहेत. त्यानुसार ३० जुलै रोजी निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होणार असून या पार्श्वभूमीवर सोमवारी राखीव प्रवर्गासाठी चिठ्ठ्यांच्या माध्यमातून सोडत काढण्यात आली. यानुसार विद्यापीठाच्या अखत्यारीत येणाऱ्या २९४ कॉलेजमधील आरक्षण जाहीर करण्यात आले. आरक्षण सोडतीसाठी कोल्हापूर, सांगली व सातारा या जिल्ह्यातून मोठ्या संख्येने विद्यार्थी सकाळी अकरा वाजल्यापासूनच विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सिनेट सभागृहात विद्यार्थी आले होते. विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत विद्यार्थ्यांच्याच हस्ते सोडत काढण्यात आली.

यामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्याजमाती, इतर मागासवर्गीय या राखीव प्रवर्गांना शिवाजी विद्यापीठाच्या अखत्यारीत समाविष्ट असलेल्या कॉलेजमध्ये कोणत्या प्रवर्गाचे आरक्षण जाहीर झाले याचे चित्र स्पष्ट होईल तशा विद्यार्थ्यांमधून संमिश्र प्रतिक्रिया व्यक्त झाल्या.

दरम्यान, एकुण २९४ कॉलेजसाठी आरक्षण सोडत पूर्ण होण्यासाठी चार तासांचा अवधी लागला. एससी प्रवर्गासाठी ७६ महाविद्यालयांमध्ये आरक्षण जाहीर झाले. तर एसटी प्रवर्गातून ४१ कॉलेजमध्ये यंदाची निवडणूक रंगणार आहे. व्ही.जे.साठी ए या गटातून १८ कॉलेजमधील विद्यार्थ्यांना संधी मिळणार आहे. एनटी प्रवर्गातील बी गटातून १५ कॉलेजला आरक्षण मिळाले तर सी गटातून २० कॉलेजची वर्णी लागली आहे. डी गटातून १२ कॉलेजमधील विद्यार्थी रिंगणात उतरू शकतात. ओबीसी प्रवर्गातून ११२ कॉलेजमध्ये आरक्षण मिळाले आहे.

> “ सप्टेंबरअखेर निवडणूक प्रक्रिया राबवण्याचे आदेश राज्य सरकारचे असल्यामुळे तसेच कायद्यानुसार आरक्षणनिहाय निवडणूक प्रक्रिया राबवली जाणार असल्यामुळे सोमवारी सात राखीव प्रवर्गासाठी आरक्षण जाहीर केले. या आरक्षणानुसार विद्यार्थ्यांना उमेदवारीची संधी मिळणार आहे. दरम्यान, याबाबत आरक्षणानुसारच्या कॉलेजची यादी व संपूर्ण कार्यक्रम ३० जुलै रोजी विद्यापीठातर्फे जाहीर करण्यात येणार आहे.
>
> आर.व्ही. गुरव, संचालक,
> विद्यार्थी कल्याण मंडळ

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 JUL 2019
तरुण भारत

# स्टुडंट कौन्सिल निवडणुकीचे आरक्षण जाहीर

## आज निवडणूक वेळापत्रक जाहीर होणार : विद्यार्थ्यांची गर्दी

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

नवीन कायद्यानुसार महाविद्यालय, विद्यापीठ स्टुडंट कौन्सिलच्या निवडणुकीचे आरक्षण सोडत विद्यार्थ्यांच्या हस्ते चिठ्ठ्या काढून जाहीर करण्यात आले. त्यानुसार अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, निरधिसुचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय संवर्ग कोणत्या महाविद्यालयास कोणते आरक्षण मिळाले याचे चित्र स्पष्ट झाले आहे. मंगळवारी (दि. ३०) निवडणूक कार्यक्रम जाहीर होणार आहे.

आरक्षण सोडतीचे वाचन विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी केले. निवडणूक समितीचे अध्यक्ष डॉ. टी. एम. गुरव, निवडणूक अधिकारी डॉ. डी. एन. काशिद, सदस्य



ए. बी. कोळेकर, एस. प. कोंबडे, विद्यार्थी विकास मंडळ विभागातील कर्मचारी उपस्थित होते. विद्यापीठ परिक्षेत्रातील राजाराम कॉलेज, विवेकानंद कॉलेज, गोखले कॉलेज, कॉमर्स कॉलेज, शहाजी कॉलेज यासह शहरातील २९४ महाविद्यालय व विद्यापीठ अधिविभागांमधील संवर्गाचे आरक्षण जाहीर झाले आहे.

**निवडणुकीसंदर्भात विद्यार्थ्यांच्या कार्यशाळा घेणार**

ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात विद्यापीठातील प्रत्येक अधिविभागात

| संवर्ग | महाविद्यालये |
|---|---|
| एस. सी. | ७६ |
| एस. टी. | ४१ |
| व्ही. जे.–ए | १८ |
| एन. टी.–बी | १५ |
| एन. टी.–सी | २० |
| एन. टी.–डी | १२ |
| ओ. बी. सी. | ११२ |
| **एकूण** | **२९४** |

कार्यशाळा घेतली जाणार आहे. आचारसंहिता, नियम व अटी, अधिकार मंडळ, विद्यार्थी मंडळ, विद्यार्थी परिषद कसे असणार यासंदर्भात मार्गदर्शन केले जाणार आहे. निवडणुकीसंदर्भातील सर्व माहिती व निवडणूक समितीतील काही सदस्यांचे फोननंबरही विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर केले जाणार असल्याचे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी सांगितले.

# विद्यापीठात गुरुवारी पुस्तक प्रदर्शन

कोल्हापूर : बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर यांची जयंती शिवाजी विद्यापीठातील बॅ. खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रामध्ये गुरुवारी (दि. १) सकाळी ११ वा. साजरी केली जाणार आहे. यावेळी साहित्यिक पु. ल. देशपांडे आणि ग. दि. माडगूळकर यांच्या शताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या प्रकाशित साहित्याचे, ग्रंथालयातील पुस्तकांचे प्रदर्शन आयोजित केले आहे.

# पन्हाळा परिसरात काटे कोरंटीची नवी जात

**Gurubal.mali**
@timesgroup.com
Tweet : gurubalmaliMT

## प्रा. डॉ. मिलिंद सरदेसाई यांच्यासह सहकाऱ्यांकडून शोध

**कोल्हापूर :** सह्याद्रीच्या रांगांमध्ये नानाविध वनस्पतींचा खजिनाच आढळतो. त्यामधील काही वनस्पतींची नोंद कोणत्याही संशोधन ग्रंथात नाही. या पार्श्वभूमीवर पन्हाळा परिसरात असलेल्या काटे कोरंटीच्या एका जातीचा शोध वनस्पतीशास्त्र संशोधकांनी लावला. केवळ पश्चिम घाटामध्ये असणाऱ्या या जातीला 'बारलेरीया सह्याद्रिका' असे नाव देण्यात आले. मूळच्या पन्हाळ्याच्या पण सध्या पुणे विद्यापीठात असणाऱ्या संशोधक प्रा. डॉ. मिलिंद सरदेसाई यांच्यासह त्यांच्या सहकाऱ्यांनी हा शोध लावला.

कोरंटी, काटे कोरंटी, पांढरी कोरंटी, निळी कोरंटी अशी स्थानिक मराठी नावे असणाऱ्या बारलेरियाला इंग्रजीत 'पोर्कुपाईन फ्लॉवर' म्हणून ओळखले जाते. बारलेरियाच्या आफ्रिका आणि आशियाच्या उष्ण कटिबंधात जवळपास तीनशे जाती आढळतात. त्यातील केवळ २८ जाती भारतात आढळतात. त्यातील काही काटे असणाऱ्या तर अनेक बिनकाट्याच्या आहेत. बहुतेक सर्व जाती पांढरी, पिवळी, केशरी, निळी, गुलाबी अशा मोठी आणि आकर्षक फुले असणाऱ्याच आहेत. जवळपास १४ जाती भारतीय



आहेत. सह्याद्रीच्या रांगामध्ये ही वनस्पती आढळते. पन्हाळा परिसरात या वनस्पतीचा सूक्ष्म अभ्यास केल्यानंतर ही नवी जात स्पष्ट झाली.

काटे कोरंटीला दोन ते चार किंवा चार ते आठ अशा काट्यांचा समूह असतो. त्यावर त्यांचे वर्गीकरण केले जाते. सर्वप्रथम पन्हाळ्यावर आढळलेल्या बारलेरीयाच्या या जातीतील वनस्पतीला प्रथम वनस्पतीशास्त्र अभ्यासकानी 'बारलेरीया कुस्पिडाटा' असे संबोधले होते. अजिंठा लेण्यांच्या डोंगरावर बारलेरीया कुस्पिडाटा वाढते. पन्हाळगडावरील आणि अजिंठ्यातील नमुने जेव्हा एकत्रित अभ्यासले तेव्हा लक्षात आले की, पन्हाळ्यातील जात ही काहीतरी वेगळी जात आहे. दरम्यानच्या काळात आर्य वैद्यशाळा, कोटक्कलचे डॉ. प्रभुकुमार आणि सहकाऱ्यांनी तामिळनाडूच्या अनेक भागातून बारलेरीया कुस्पिडाटा नोंदवली. पुढे रॉयल बोटानिक गार्डनचे डॉ. एस. जी. निस यांनी कोरंटीची पन्हाळ्यातील ही जात नवीन असण्यावर शिक्कामोर्तब केले.

न्युझीलंडमधून प्रकाशित होणाऱ्या 'फायटोटॅक्सा' या प्रसिद्ध आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये हा प्रबंध नुकताच प्रकाशित झाला. फोंडा घाटापासून ते अगदी माळशेज घाटापर्यंत शुष्क पानझडीच्या जंगलात ही जात आढळते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ मिलिंद सरदेसाई आणि केरळमधील आर्य वैद्य शाळा, कोटक्कलचे डॉ. के. एम. प्रभुकुमार व सहकारी यांच्या संयुंक्त अभ्यासातून हे संशोधन प्रकाशित केले आहे. कोरंटीच्या अनेक जाती दातदुखी, माकड खोकला आणि लघवीच्या विकारांवर औषध म्हणून वापरल्या जातात.

प्रसिद्ध वज्रदंतीतील एक घटक म्हणूनही काटे कोरंटीची ओळख आहे. ह्या सर्व अभ्यासात आर्य वैद्य शाळा, कोटक्कलच्या डॉ. इंदिरा बालचंद्रन, कालीकत विद्यापीठाचे व्ही एस हरीश, आणि सेंट जोसेफ कॉलेज, कालिकतचे बिनू थॉमस व सतीश जॉर्ज सहभागी झाले.



**पन्हाळ्याच्या परिसरात अनेक प्रकारच्या वनस्पती आढळतात. याच परिसरात काटे कोरंटीच्या एका जातीचा शोध लावला. यामुळे पन्हाळ्याची नोंद पुन्हा एकदा जगाच्या नकाशावर ठळक झाली.**

– प्रा. डॉ. मिलिंद सरदेसाई, पुणे विद्यापीठ

**कोरंटीच्या अनेक जाती शोभिवंत आणि आकर्षक फुले असणाऱ्या आहेत. त्यांना लागवडीखाली आणले जाऊ शकेल. त्यातून अनेक जातींचे संवर्धन होईल. शिवाजी विद्यापीठामध्ये असे प्रयत्न सुरु आहेत. ही वनस्पती औषधी असल्याने भविष्यकाळात याचा निश्चितच उपयोग होऊ शकतो.**

– प्रा. डॉ. एस. आर. यादव, वनस्पती शास्त्रज्ञ, शिवाजी विद्यापीठ

# विद्यापीठात १ ऑगस्टला पुस्तक प्रदर्शन

**कोल्हापूर :** बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या वतीने गुरुवारी (दि. १) सकाळी ११ वाजता बॅ. बाळासाहेब खर्डेकर यांची जयंती साजरी करण्यात येणार आहे. याच दिवशी ज्येष्ठ साहित्यिक पु. ल. देशपांडे व ग. दि. माडगूळकर यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने त्यांचे प्रकाशित साहित्य व प्रकाशनास शंभर वर्षे पूर्ण झालेल्या ग्रंथालयातील पुस्तकांचे प्रदर्शन भरविण्यात येणार आहे.

पुढारी

# स्त्री अभ्यास केंद्र प्रवेशाची आज तात्पुरती गुणवत्ता यादी

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठातील स्त्री अभ्यास केंद्र एम. ए. भाग - १ अभ्यासक्रमाच्या प्रवेशाची तात्पुरती गुणवत्ता यादी मंगळवार (दि. ३०) रोजी जाहीर होणार आहे. स्त्री अभ्यास केंद्राच्या प्रवेशासाठी दि. ६ ते २४ जुलैदरम्यान प्रवेश अर्ज मागविण्यात आले होते. त्यानंतर मंगळवारी तात्पुरती गुणवत्ता यादी जाहीर होईल. ३ ऑगस्टला अंतिम गुणवत्ता यादी जाहीर होईल. ५ ऑगस्ट रोजी उपलब्ध जागांची माहिती प्रसिद्ध होईल. ६ ऑगस्ट रोजी प्रत्यक्ष प्रवेशाची प्रक्रिया चालणार आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांनी दिली.